# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २०/१०/२०२४ (रविवार) दुपार**

---

## पोस्टे बोरी हद्दीतील गवळी टोला, आसोला, पारधी बेडा ता. हिंगणा परिसरात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २०/१०/२०२४ रोजी बुट्टीबोरी येथील गवळी टोला, आसोला, पारधी बेडा ता. हिंगणा परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– आकाश ऊर्फ विकास तुलाराम वाघमारे वय ३० वर्ष रा.गवळी टोला, पारधी बेडा आसोला, ता. हिंगणा जि. नागपूर** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) दोन प्लॅस्टिक डबकी मध्ये ४० लिटर मोहफुल गावठी दारू किमती ४०००/–रु २) ०४ लोखंडी व ०३ प्लास्टीक ड्रम मध्ये मोहफुल रसायन सडवा प्रत्येकी २०० लिटर एकूण १४०० लिटर प्रत्येकी लिटर ३५/– रुपये प्रमाणे एकूण किमती ४९,०००/– रु , ३) ४ लोखंडी खाली ड्रम किंमत २००० रू ४) ३ प्लास्टिकचे खाली ड्रम किंमत ३००० रू ५) २ प्लास्टिक खाली डबकी किंमत ४०० रू. ६) जळाऊ लाकूड अंदाजे ०१ टन किंमती २५०० रुपये ७) दारु गाळण्याचे इतर साहित्य किंमत १५०० रू असा एकूण किंमत ६२,४००/– रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले. वर नमूद आरोपी विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि सागर गोमाशे, सफौ मिलींद नांदुरकर, पोहवा विष्णू जायभाय यांनी पार पाडली.

## अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

पोस्टे कन्हान अंतर्गत बोर्डा बस स्टॉप कन्हान येथे दि. १९/१०/२०२४ रोजी आरोपी नामे– विशाल नामदेव चिचोळकर वय ३६ वर्ष रा धरमनगर कन्हान याचा ताब्यात विनापरवाना लोखंडी धार धार चाकु ज्याची लांबी मुठ सह १५ इंच पात्त्याची लांबी ९.५ इंच तसेच लोखंडी मुठेची लांबी ५.५ इंच पात्याची चाडाई १.७५ इंच कि ५००/रू मिळुन आल्याणे आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे कलम ४, २५ आर्म ॲक्ट सह कलम १३५ म.पो का अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अप्पर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि ओमप्रकाश कोकाटे, सपोनि किशोर शेरकी, मनोज गदादे, जीवन राजगुरू, सफौ विनोद काळे, पोहवा किशोर वानखेडे, प्रमोद भोयर, नारायण राठोड, संजय बरोदीया, पोशि मनिश, अमित मेहरे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**